मुंबईत ७९४ नवे रुग्ण; २० बाधितांचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबईत रविवारी ७९४ नव्या रुग्णांची नोंद झाली तर २० रुग्णांचा मृत्यू झाला. तर एका दिवसात ८३३ रुग्ण करोनामुक्त झाले. मुंबईतील रुग्णवाढीचा दर ०.१३ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. तर रुग्णदुपटीचा कालावधी ५२७ दिवसांपर्यंत वाढला आहे. गेल्या आठवड्याभरापासून मुंबईतील दैनंदिन रुग्णांची संख्या हजाराखाली स्थिरावली आहे.

रविवारी ७९४ नवीन रुग्णांची नोंद झाल्यामुळे एकूण बाधितांची संख्या ७ लाख ११ हजारापुढे गेली आहे. एका दिवसात ८३३ रुग्ण बरे झाल्यामुळे आतापर्यंत ६ लाख ७८ हजाराहून अधिक म्हणजेच ९५ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. त्यामुळे उपचाराधीन रुग्णांची संख्या घटली आहे. सध्या १६ हजार ७० उपचाराधीन रुग्ण आहेत.

शनिवारी २६ हजार ७५८ चाचण्या करण्यात आल्या होत्या. त्यापैकी चार टक्क्यांपेक्षा कमी नागरिक बाधित आढळले आहेत. आतापर्यंत ६४ लाखांहून अधिक चाचण्या करण्यात आल्या आहेत. रुग्णवाढीचा दर ०.१३ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. रुग्ण दुपटीचा कालावधीही ५२७ दिवसांवर पोहोचला आहे. रविवारी २० रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली.

ठाणे जिल्ह्यात ५५८ बाधित

ठाणे : ठाणे जिल्ह्यात रविवारी ५५८ रुग्ण आढळले. तर ३३ जणांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील ५५८ करोना रुग्णांपैकी कल्याण-डोंबिवली १४६, ठाणे १२४, नवी मुंबई ८१, ठाणे ग्रामीण ७४, मिरा-भाईंदर ६५, अंबरनाथ २१, बदलापूर २०, उल्हासनगर १६ आणि भिवंडीत ११ रुग्ण आढळून आले. तर ३३ मृतांपैकी कल्याण-डोंबिवली २२, नवी मुंबई चार, मिरा-भाईंदर तीन, ठाणे एक, उल्हासनगर एक, अंबरनाथ एक आणि भिवंडीत एकाचा मृत्यू झाला.

मुख्यमंत्र्यांची जिल्हाधिकारी, आयुक्तांना सक्त ताकीद

नियमभंग खपवून घेणार नाही!

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : राज्यात अजूनही करोनाचे आव्हान संपलेले नाही. कोणत्याही स्तरामध्ये कोणत्याही परिस्थितीत सार्वजनिक कार्यक्रम, समारंभात गर्दी होणार नाही याची काटेकोर काळजी घ्या, नियमांचे उल्लंघन खपवून घेणार नाही, अशी स्पष्ट ताकीद मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्तांना दिली.

लोकांना थोडा दिलासा देण्यासाठी निर्बंध शिथिल करताना जे निकष आणि पाच स्तर ठरविले आहेत त्यावर स्थानिक प्रशासनाने विचार करून निर्बंधांच्याबाबतीत निर्णय घ्यावा. कुठेही सरसकट निर्बंध शिथिल करण्यात आलेले नाहीत. कोणाच्याही दबावाला बळी पडू नका, असेही मुख्यमंत्र्यांनी बजावले.

करोनाची साखळी तोडण्यासाठी लागू असलेल्या निर्बंधांबाबत निकष आणि पातळ्या निश्चित करण्याच्या सरकारच्या ४ जूनच्या आदेशानंतर राज्यभरात निर्बंध शिथिल झाल्याचा समज निर्माण झाला होता. त्यावर दूरचित्रसंवादाच्या माध्यातून झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पालिका आयुक्त व पोलीस अधिकारी यांची एकत्रित बैठक घेऊन राज्यात कुठेही सरसकट निर्बंध शिथिल करण्यात आले नसून आपापल्या भागातील परिस्थितीनुसार प्रसंगी निर्बंध कडक करण्याचा निर्णयही घ्यावा असे आदेश दिले. गेल्या वर्षी सण, उत्सवानंतर संसर्ग वाढला होता, यावेळेस ही दुसरी लाट सणवारांच्या अगोदर आली आहे. दुसरे म्हणजे उत्परीवर्तन झालेल्या या विषाणूमुळे संसर्ग मोठ्या प्रमाणावर वाढला असून यापासून अधिक सावध राहण्याची गरज आहे. नाहीतर तिसऱ्या लाटेत मोठे आव्हान उभे राहील असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला.

दुसऱ्या लाटेचा सामना करताना रुग्ण संख्या कमी करण्यात आपल्याला यश येत असले तरी तिसऱ्या लाटेचा धोका कायम आहे. ज्याप्रमाणे आपण प्रत्येक पावसाळ्यात आपापल्या भागातील नदी व धरणातील पाणी साठ्यावर लक्ष ठेवून असतो व विशिष्ट रेषेच्या वर पाणी पातळी वाढली तर लगेचच नागरिकांचे स्थलांतर किंवा इतर पावले उचलतो अगदी त्याचप्रमाणे करोनासाठी निर्बंध लावायचे किंवा नाही याकरिता या पातळ्या ठरविण्यात आल्या आहेत असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, करोना रुग्णाच्या संख्येत चढ-उतार होत असतात. आपण स्तर ठरविले असले तरी संसर्ग किती वाढेल याविषयी आपल्या मनात शंका असतील तर व्यवहारांवर निर्बंध घाला, कुठल्याही दबावाला बळी पडू नका. कोणत्याही परिस्थितीत करोनाला आमंत्रण देणारी गर्दी , समारंभ, सोहळे चालणार नाहीत. आरोग्याच्या नियमांचे काटेकोर पालन झाले पाहिजे. दैनंदिन व्यवहार किती सुरू करायचे, किती काळ सुरु ठेवायचे या निर्णयाचा अधिकार सर्व स्थानिक जिल्हा प्रशासनाना असेल अशा स्पष्ट सूचनाही त्यांनी दिल्या.

करोनामुक्त गावांची टक्केवारीही गृहीत धरणार...

नागरिकांनी करोनाच्या काळात आरोग्याचे नियम पाळून तसेच सुसंगत वर्तणूक ठेऊन आपापल्या जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या निर्णयास सहकार्य करायचे आहे. यासाठी आपापल्या जिल्ह्यात पुरेशी जनजागृती करा. ग्रामीण भागात कोरोना संसर्ग वाढतोय, त्याला रोखण्यासाठी आपण करोनामुक्त गाव करा असे आवाहन केले आहे. या करोनामुक्त गावांची टक्केवारी देखील आपल्याला या नव्या पातळ्यांमध्ये गृहीत धरावी लागेल, असेही मुख्यमंत्री ठाकरे यांनी स्पष्ट केले.

ज्येष्ठ अभिनेते दिलीपकुमार रुग्णालयात

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : ज्येष्ठ अभिनेते दिलीपकुमार यांची प्रकृती बिघडल्याने रविवारी सकाळी त्यांना खार येथील पी.डी. हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

'केवळ दैनंदिन तपासणीसाठी त्यांना रुग्णालयात आणले आहे. डॉ. नितीन गोखले त्यांच्यावर उपचार करत असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत ते घरी येतील,' अशी माहिती दिलीपकुमार यांच्या ट्वीटर खात्यावरून त्यांच्या पत्नी सायरा बानो यांनी दिली आहे.

बेस्ट आजपासून पूर्ण प्रवासी क्षमतेने

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : कठोर निर्बंध आज, सोमवारपासून काहीसे शिथिल होत असल्याने बेस्ट प्रवाशांनाही दिलासा मिळणार आहे. बेस्ट बसगाड्यांमधील पूर्ण आसनक्षमतेनुसार प्रवासी वाहतूक करण्यासाठी परवानगी दिल्याची माहिती बेस्ट उपक्रमाने दिली. उभे राहून प्रवास करण्यास बंदी असेल.

करोनाच्या दुसऱ्या लाटेत सार्वजनिक वाहतुकीवर निर्बंध आले. त्यात बेस्टबसमधूनही ५० टक्के प्रवासी क्षमतेनुसार वाहतूक करण्याची परवानगी दिली होती. यामध्ये एका आसनावर एक प्रवासी व उभ्याने प्रवासी न घेण्याचा नियम होता. सर्वसामान्यांसाठी लोकल बंद, बेस्ट मार्गावरील एसटी गाड्यांही

कमी झाल्याने प्रवासी पूर्णपणे बेस्टवरच अवलंबून राहिले. परंतु ५० टक्के प्रवासी क्षमतेनुसार बस धावत असताना अनेक गैरसोयिंचा सामना प्रवाशांना करावा लागला. ऐन गर्दीच्या वेळी चालक, वाहक प्रवास नाकारत असल्याने प्रवासी त्यांचे न ऐकताच बसमध्ये प्रवेश करत होते. त्यामुळे काही मार्गांवरील बसगाड्यांना गर्दी होत होती. त्यात एका आसनावर दोन प्रवासी किंवा उभ्यानेही प्रवासी प्रवास करत असल्याने वाहक आणि प्रवाशांमध्ये वाद होत होते. मात्र सोमवारपासून १०० टक्के आसनक्षमतेनुसार बसगाड्या चालवल्या जाणार असल्याने प्रवाशांना काहीसा दिलासा मिळणार आहे.

लोकल अत्यावश्यक कर्मचाऱ्यांसाठी

तिसऱ्या टप्प्यात समावेश असल्याने मुंबई उपनगरीय रेल्वे अत्यावश्यक कर्मचाऱ्यांसाठीच उपलब्ध होणार आहे. सामान्य प्रवाशांना या सेवेची आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागेल. फक्त अत्यावश्यक सेवांसाठी लोकल असल्याने अन्य प्रवाशांना बेस्ट, एसटी, रिक्षा, टॅक्सीवरच अवलंबून राहावे लागत आहे.

मेट्रो फेऱ्यांमध्ये वाढ

घाटकोपर ते वर्सोवा ते अंधेरी मेट्रोच्या फेऱ्यांत आज, सोमवारपासून वाढ होणार आहे. मेट्रोच्या सध्या दिवसाला १०० फेऱ्या होत होत्या. आता यात ३० टक्के वाढ करण्यात येत असल्याचे मुंबई मेट्रो वनकडून सांगण्यात आले.

ठाणे शहर, नवी मुंबई वगळता उर्वरित जिल्हा तिसऱ्या स्तरात

उपाहारगृहे, व्यायामशाळा, केश कर्तनालये, खासगी कार्यालये ५० टक्के क्षमतेने

बदलापूर / कल्याण : ठाणे जिल्ह्यातील ठाणे शहर आणि नवी मुंबई वगळता कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर, उल्हासनगर महापालिका, अंबरनाथ, कुळगाव बदलापूर नगरपरिषद, शहापूर आणि मुरबाड नगर पंचायत तसेच ग्रामीण क्षेत्राला तिसऱ्या स्तरातील शिथिलतेची मुभा मिळाली आहे.

तिसऱ्या स्तराप्रमाणे या भागातील निर्बंध शिथिल होणार असून त्याची अंमलबजावणी सोमवारपासून होणार आहे. हे निर्बंध शिथिलतेचे आदेश १३ जूनपर्यंत लागू राहणार आहेत.

ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी निर्बंध शिथिल करण्याचे आदेश रविवारी जारी केले. त्यानुसार या सर्वच भागांत अत्यावश्यक वस्तूसह इतर आस्थापना सोमवार ते शुक्रवार दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. तर, उपाहारगृहे, व्यायामशाळा, केशकर्तनालये, खासगी कार्यालये ५० टक्के क्षमतेने सुरू ठेवता येतील. मॉल्स, सिनेमागृहे, नाट्यगृहे बंदच राहणार आहेत. उपाहारगृहे सोमवार ते शुक्रवार ५० टक्के क्षमतेने दुपारी ४ पर्यंत सुरू राहतील. दुपारी ४ नंतर तसेच शनिवारी आणि रविवारी केवळ पार्सल सुविधा आणि घरपोच सेवा सुरू राहील.

सार्वजनिक ठिकाणे, खुली मैदाने, चालणे, सायकलिंग करण्यासाठी दररोज सकाळी ५ ते सकाळी ९ वाजेपर्यंत मुभा आहे.

शासकीय कार्यालयांसह परवानगी असलेली खासगी कार्यालये ५० टक्के उपस्थितीत दुपारी ४ पर्यं सुरू ठेवता येतील. मैदानी खेळांना सकाळी ५ ते ९ आणि सायंकाळी ६ ते ९पर्यंत परवानगी असेल. चित्रिकरणासाठी दुपारी ४ वाजेपर्यंत परवानगी आहे. सामाजिक मेळावे, सांस्कृतिक आणि करमणुकीचे कार्यक्रम ५० टक्के क्षमतेने आयोजित करता येतील. लग्न समारंभांसाठी ५० लोकांच्या तर अंत्यसंस्कार विधी २० लोकांच्या उपस्थितीत करता येईल. बैठका, स्थानिक सहकारी संस्थांच्या निवडणुका सभागृहाच्या ५० टक्के बैठक क्षमतेने घेता येतील. ई-कॉमर्स साहित्य व सेवा पूर्वीप्रमाणे नियमित सुरू राहतील. जमावबंदी सायंकाळी ५ वाजेपर्यंत तर संचारबंदी सायंकाळी ५ वाजल्यानंतर लागू राहील. सार्वजनिक परिवहन सेवा १०० टक्के क्षमतेने सुरू ठेवण्यास परवानगी असली तरी प्रवाशांना उभे राहून प्रवास करता येणार नाही. उपनगरीय लोकल वाहतूकीबाबत मुंबई महापालिकेने निर्गमित केलेले आदेश लागू राहतील.

उत्पादनाबाबत...

उत्पादन निर्यातीचे बंधन पूर्ण करण्याची आवश्यकता असलेल्या लघु, मध्यम आणि सुक्ष्म प्रकल्प नियमितपणे सुरू राहतील.

नव्या आदेशात काय?

- राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या वस्तूंचे उत्पादन सुरू राहील.
- अत्यावश्यक ,गंभीर स्वरुपाच्या पायाभूत सेवा सुविधा देणारे डेटा सेंटर आयटी सेवा नियमित सुरू राहतील.
- उत्पादन सेक्टरमधील इतर सर्व उत्पादन घटक ५० टक्के कर्मचारी क्षमतेने सुरू राहतील.
- हे आदेश सोमवारी सकाळी ७ वाजल्यापासून १३ जून रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील असे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी स्पष्ट केले आहे.

औषधांची दुकाने २४ तास खुली

मुंबई : निर्बंध शिथिल करण्यासाठी मुंबई महापालिकेने तयार केलेल्या नियमावलीची आज, सोमवारपासून अंमलबजावणी होणार आहे. राज्य सरकारच्या नियमावलीनुसार त्यात अत्यावश्यक सेवेसह सर्व दुकाने संध्याकाळी ४ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी दिली असली, तरीही औषधांची दुकाने २४ तास सुरू ठेवण्याची मुभा दिली आहे.

मुंबई शहर आणि उपनगराचा समावेश तिसऱ्या टप्प्यात करण्यात आला आहे. या टप्प्याकरिता लागू करण्यात आलेले सर्व नियम पालिका प्रशासनाने स्वीकारले आहेत. त्यानुसार मुंबईत सर्व दुकाने व आस्थापने दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी राज्य सरकारने दिली. तर पालिकेने यात सुधारणा करून औषध विक्रीची दुकाने सर्व दिवस २४ तास सुरू ठेवण्याची परवानगी दिली आहे.

समित्यांच्या बैठका प्रत्यक्ष घेण्याची मागणी

नव्या नियमांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बैठका ५० टक्के उपस्थितीत घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. मुंबई महापालिकेच्या सर्व बैठका सध्या दूरचित्र संवाद माध्यमातून होत आहेत. त्यामुळे या सर्व बैठका प्रत्यक्ष घेण्याची मागणी पालिकेतील विरोधी पक्षांचे सदस्य करू लागले आहेत.

आता ई-पासशिवाय एसटीतून प्रवासास मुभा

चार स्तरातील जिल्ह्यांत ये-जा करणे आजपासून शक्य

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई: एसटीची सेवा आज, सोमवारपासून सामान्यांसाठीही सुरू होत आहे. काही जिल्ह्यांत निर्बंध शिथिल होत असल्याने एसटीने एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यातही जाता येईल.

राज्याची पाच स्तरांमध्ये विभागणी करून निर्बंध शिथिल केले आहेत. यात पहिल्या चारही स्तरात मोडणाऱ्या जिल्ह्यांत ई-पास शिवाय प्रवास करता येणार आहे. आज, सोमवारपासून निर्बंध शिथिल होत असल्याने एसटीला काहीसा दिलासा मिळणार आहे. राज्याची पाच स्तरांमध्ये विभागणी

करताना पहिल्या स्तरातील नागपूर, अहमदनगर, चंद्रपूर, धुळे, गोंदिया, जळगाव, जालना, लातूर, नांदेड, यवतमाळ मध्ये सर्व निर्बंध हटवण्यात आले आहेत. तसेच दुसऱ्या स्तरातील हिंगोली, नंदूरबारमध्येही निर्बंध शिथिल केले आहेत. तिसऱ्या आणि चौथ्या स्तरातील जिल्ह्यांत ५० टक्के क्षमतेने वाहतूक सुरू राहिल. पाचव्या स्तरातील जिल्ह्यांत निर्बंध कठोर असल्याने ई-पास बंधनकारक असणार आहे.

गोंधळाची परिस्थिती : यासंदर्भात एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी, शासनाच्या नियमानुसार राज्यातील सुरुवातीच्या चार टप्प्यांत मोडणाऱ्या जिल्ह्यांत एसटी सेवा पुर्ववत होईल, जिल्हा ते जिल्हा प्रवास करता येणार असल्याचे सांगितले. तरीही याबाबत स्थानिक प्रशासनाला अधिकार असल्याने त्यांच्याशी चर्चा सुरू आहे. यात काही जिल्ह्यांतील अंतर्गत सेवाही ५० टक्के प्रवासी क्षमतेने आहे. त्यामुळे या जिल्ह्यातून अन्य राज्यात जाणाऱ्या एसटी सेवांच्या नियोजनाबाबतही चर्चा सुरू असल्याचे ते म्हणाले.

एसटीचे ऑनलाईन आरक्षण : काही तांत्रिक कारणांमुळे एसटीच्या लांब पल्ल्याच्या आणि मध्यम पल्ल्याच्या गाड्यांचे ऑनलाईन आरक्षणही सोमवारी मध्यरात्रीपासून सुरू होईल. तोपर्यंत आगारात लांब पल्ल्याची एसटी उपलब्ध असल्यास गाडीतच प्रवाशांना वाहकाकडून तिकीट मिळेल, असेही चन्ने यांनी स्पष्ट केले. प्रवाशांची मागणी व गर्दी पाहूनच एसटी बसगाड्यांचे नियोजन केले जाणार असून सरसकट सर्वच गाड्या सोडल्या जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मिनोशा इंडिया लिमिटेड

(पूर्वीची रिको इंडिया लिमिटेड)

नोंदणीकृत कार्यालय: युनिट नं. २०४, दुसरा मजला, टाऊन सेंटर I, मित्तल इंडस्ट्रियल इस्टेटजवळ, अंधेरी-कुर्ला रोड, साकीनाका, अंधेरी (पू.), मुंबई-४०००५९
सीआयएन: एल७४९४०एमएच१९९३पीएलसी०७४६९४
टेलि. क्र.: +९१-२२-६६८३३०००; ईमेल: **mil.secretarial@minosha.in**
वेबसाइट: **https://www.minosha.in**

२७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, सदस्यांची नोंदवही बंद असणे व रिमोर्ट ई-व्होटिंगबाबत माहिती

याद्वारा सूचना देण्यात येते की, कंपनीच्या सदस्यांची २७वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'')/ अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (''ओएव्हीएम'') द्वारा बुधवार, ३० जून, २०२१ रोजी स. ९.०० वा. (भाप्रवे) घेण्यात येणार आहे.

सध्या चालू असलेली कोव्हिड-१९ जागतिक महामारी लक्षात घेता निगम कामकाज मंत्रालयाने तिच्या दिनांकित ०८ एप्रिल, २०२० परिपत्रक क्र. १४/२०२० व दिनांकित १३ एप्रिल, २०२० परिपत्रक क्र. १७/२०२० यासह वाचलेल्या दिनांकित ०५ मे, २०२० परिपत्रक क्र. २०/२०२० व दिनांकित १३ जानेवारी, २०२१ परिपत्रक क्र. ०२/२०२१ याद्वारा सामाईक स्थळी सभेकरिता सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'') किंवा अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (''ओएव्हीएम'')मार्फत कंपनीद्वारा वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आयोजनास संमती दिली आहे. उक्त एमसीए परिपत्रके आणि कंपन्या अधिनियम, २०१३ च्या तरतुदींच्या अनुपालनार्थ कंपनीची २७वी एजीएम ''व्हीसी''/ ''ओएव्हीएम''द्वारा घेण्यात येत आहे म्हणून, सदस्य केवळ ''व्हीसी'' / ''ओएव्हीएम''द्वारा एजीएममध्ये हजर राहू शकतील आणि सहभागी होऊ शकतील.

वर नमूद केलेल्या लागू तरतुदी आणि परिपत्रकांच्या अनुपालनार्थ, कंपनीच्या २०१९-२०२० वार्षिक अहवालासह २७ व्या एजीएमची सूचना केवळ अशा सदस्यांना, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनीच्या रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्सफर एजन्ट/ डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक प्रणालीत पाठविण्यात येत आहेत. कंपनीच्या २०१९-२०२० वार्षिक अहवालासह २७व्या एजीएमची सूचना **www.minosha.in** या कंपनीच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आली आहे. एजीएमची सूचना सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडच्या वेबसाइटवरसुद्धा म्हणजेच **www.evotingindia.com** यावर प्रसारित करण्यात आली आहे (एजन्सी एजीएम कालावधीत ''व्हीसी'' / ''ओएव्हीएम'' सुविधा, रिमोट ई-व्होटिंग व ई-व्होटिंग सुविधा / प्रणालीची तरतूद करून देत आहे).

एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत पाठविणे आवश्यक असल्यामुळे सदर एजीएमची सूचना व वार्षिक अहवालाची प्रत पूर्वोक्त एमसीए परिपत्रकांअन्वये वितरित करण्यात आली आहे.

कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४च्या नियम २० यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३च्या कलम १०८ च्या तरतुदींच्या अनुपालनार्थ, कंपनीला इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारा तिच्या सदस्यांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजाविण्याकरिता सुविधेची तरतूद करून देताना आनंद वाटत आहे. सभेच्या ठिकाणाखेरीज अन्य ठिकाणावरून इलेक्ट्रॉनिक व्होटिंग सिस्टमचा वापर करून सदस्यांना मतदान (''रिमोट ई-व्होटिंग'') करण्याकरिता सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल)द्वारा सुविधेची तरतूद करून देण्यात येणार आहे.

कंपन्या अधिनियम २०१३च्या कलम ९१च्या तरतुदींच्या अनुसार, कंपनीच्या सदस्यांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण पुस्तिका कंपनीच्या २७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या हेतूप्रीत्यर्थ **२४ जून, २०२१ पासून ते ३० जून, २०२१ (दोन्ही दिवस धरून)** बंद ठेवण्यात येईल.

एमसीए परिपत्रकांच्या अनुसार सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीस मनाई केल्यामुळे तेथे प्रॉक्सीजच्या नेमणुकीची आवश्यकता नाही. तद्नुसार, कंपन्या अधिनियम २०१३च्या कलम १०५ अंतर्गत सदस्यांद्वारा प्रॉक्सीजच्या नेमणुकीची सुविधा २७व्या एजीएममध्ये उपलब्ध नसणार आहे.

तथापि, कंपन्या अधिनियम २०१३च्या कलम ११२ व कलम ११३च्या अनुसार, २७व्या एजीएम कालावधीत ''व्हीसी''/ ''ओएव्हीएम'' सुविधा व ''ई-व्होटिंग'' सुविधेद्वारा २७व्या एजीएममध्ये सहभागी होण्याकरिता, ''रिमोट ई-व्होटिंग''द्वारा मतदानाच्या हेतूप्रीत्यर्थ सदस्यांच्या प्रतिनिधींची नेमणूक करता येईल.

कंपनीने ''ई-व्होटिंग'' प्रक्रियेचे स्वच्छ व पारदर्शक रीतीने आयोजन होण्याकरिता परिनिरीक्षक म्हणून श्री. आशीष ओ लालपुरिया, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी यांची नेमणूक केली आहे.

(ए) २७व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर ''रिमोट ई-व्होटिंग'' किंवा ''ई-व्होटिंग'' प्रणालीद्वारा केवळ विचारविनिमय करण्यात येईल.

(बी) एजीएममध्ये ''रिमोट ई-व्होटिंग'' किंवा ''ई-व्होटिंग'' प्रणालीद्वारा मतदानाकरिता पात्रता निश्चित करण्याकरिता कट-ऑफ तारीख **२३ जून, २०२१** असेल.

(सी) ''रिमोट ई-व्होटिंग'' सुविधा **२७ जून, २०२१ रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे)** सुरू होईल आणि **२९ जून २०२१ रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे)** संपेल.

(डी) ''ई-व्होटिंग'' प्रणाली त्यानंतर सीडीएसएलद्वारा निःसमर्थ करण्यात येईल आणि इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारा मतदान करण्यास उक्त तारखेनंतर अनुमती दिली जाणार नाही. एकदा का भागधारकाद्वारा ठरावावर मतदान केले गेल्यास तद्नंतर ते बदलता येणार नाही.

(ई) एजीएम कालावधीत ''ई-व्होटिंग'' व मतदानाकरिता सदस्यांच्या मतदानाचा हक्क उक्त कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या समन्याय भाग भांडवलातील त्यांच्या भागधारणेशी प्रमाणबद्ध असेल.

(एफ) कोणतीही व्यक्ती जी एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचा सदस्य बनते आणि ज्यांची नावे कट-ऑफ तारीख **२३ जून, २०२१** रोजीप्रमाणे सदस्यांच्या किंवा लाभाधिकारीधारकांच्या नोंदवहीत आलेली आहेत ते २७व्या एजीएमची सूचना **www.minosha.in** या कंपनीच्या वेबसाइटवर आणि **www.cdslindia.com** या सीडीएसएलच्या वेबसाइटवरसुद्धा पाहू शकतील. सदर व्यक्ती **evoting@cdslindia.com** यावर विनंती पाठवून लॉग-इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल. तथापि, जी व्यक्ती याआधीच ''रिमोट ई-व्होटिंग''करिता सीडीएसएलकडे नोंदणीकृत आहे, तर तो/ ती विद्यमान युजर आयडी व पासवर्डचा वापर करून मतदान करू शकेल.

(जी) मतदानाकरिता सुविधा एजीएम कालावधीतसुद्धा करून देण्यात येईल आणि जे सदस्य ''व्हीसी'' / ''ओएव्हीएम'' सुविधेद्वारा उपस्थित असतील, ज्यांनी ''रिमोट ई-व्होटिंग''द्वारा ठरावावर त्यांचे मतदान केलेले नाही आणि तसे करण्यास त्यांना प्रतिबंधित केलेले नाही ते एजीएममध्ये ''ई-व्होटिंग'' प्रणालीद्वारा मतदान करण्यास पात्र असतील.

(एच) ज्या सदस्यांनी एजीएमपूर्वी ''रिमोट ई-व्होटिंग''द्वारा त्यांचे मतदान केलेले आहे तेसुद्धा एजीएममध्ये उपस्थित राहू शकतील, परंतु त्यांचे मतदान पुन्हा करण्यास हक्कदार नसतील.

(आय) ज्यांची नावे कट-ऑफ तारखेनुसार सदस्यांच्या नोंदवहीत आणि लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत अभिलिखित (रेकॉर्डेड) आहेत त्याच व्यक्ती केवळ एजीएममध्ये ''रिमोट ई-व्होटिंग'' किंवा ''ई-व्होटिंग'' सुविधेचा लाभ घेण्यास हक्कदार असतील.

(जे) ज्या सदस्यांकडे डिमटेरिअलाइज्ड स्वरूपात भाग आहेत आणि ज्यांनी त्यांच्या ईमेल पत्त्यांची नोंदणी केलेली नाही त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर ईमेल पत्त्यांची नोंदणी त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे करावी आणि ज्या सदस्यांकडे भाग प्रत्यक्ष स्वरूपात आहेत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनीचे रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्सफर एजन्ट- मेसर्स एमसीएस शेअर ट्रान्सफर एजन्ट लिमिटेड, एफ-६५, पहिला मजला, ओखला इंडस्ट्रियल एरिआ, फेज-१, नवी दिल्ली-११००२०, ईमेल: admin@mcsregistrars.com यांच्याकडे किंवा mil.secretarial@minosha.in यावरून कंपनीकडे अपडेट करावेत. भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी २७व्या एजीएमकरिता एजीएमच्या सूचनेसह २०१९-२०२० च्या वार्षिक अहवालाची सॉफ्ट कॉपी, ''रिमोट ई-व्होटिंग''करिता सूचना व ''व्हीसी''/ ''ओएव्हीएम'' सुविधेद्वारा एजीएममधील सहभागाकरिता सूचनांच्या स्वीकृतीकरिता भागधारकांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पुष्ट्यर्थ पॅनकार्ड आणि कोणत्याही कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या स्वयं-साक्षांकित प्रती (ड्राइव्हिंग लायसन्स, आधारकार्ड, पासपोर्ट व बँक स्टेटमेंट यासारखी) यासह नोंदणीकृत करण्याकरिता नाव, फोलिओ नं., पत्ता, ईमेल पत्ता नमूद करून स्वाक्षरीकृत विनंती पत्राची प्रत सादर करावी.

(के) कंपनी आणि आरटीए सीडीएसएलशी समन्वय साधतील आणि वर नमूद केलेल्या भागधारकांकरिता लॉग-इन अधिकारपत्रांची, भागधारकांकडून आवश्यक कागदपत्रे आणि माहितीच्या स्वीकृतीच्या विषयाधीन, तरतूद करून देतील.

(एल) व्यक्ती एजीएम सूचनेसह २०१९-२०२० च्या वार्षिक अहवाल यासह तरतूद होण्याकरिता mil.secretarial@minosha.in यावर कंपनीकडे विनंतीसुद्धा करू शकेल, कंपनी विनंतीकारकास त्वरित मेल पाठवील.

(एम) ''व्हीसी'' / ''ओएव्हीएम'' सुविधेद्वारा एजीएममध्ये उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची कंपन्या अधिनियम, २०१३च्या कलम १०३च्या अनुसार गणपूर्तीच्या प्रयोजनार्थ गणना करण्यात येईल.

एजीएम कालावधीत ''व्हीसी''/ ''ओएव्हीएम'', ''रिमोट ई-व्होटिंग'' व ई-व्होटिंगद्वारा एजीएममध्ये उपस्थित राहण्याकरिता सूचनांची एजीएमच्या सूचनेमध्ये तरतूद करून देण्यात आली आहे.

सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व नोंदी आणि विशेषकरून एजीएम कालावधीत ''व्हीसी'' / ''ओएव्हीएम'', ''रिमोट ई-व्होटिंग'' व ''ई-व्होटिंग''द्वारा एजीएममध्ये उपस्थित राहणाऱ्या भागधारकांकरिता दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

जर तुम्हास ''व्हीसी'' / ''ओएव्हीएम''द्वारा उपस्थिती व ''ई-व्होटिंग'' प्रणालीद्वारा ई-मतदानासंबंधित कोणतीही शंका किंवा तक्रारी असल्यास, तुम्ही हेल्प सेक्शनअंतर्गत www.evotingindia.com यावर उपलब्ध असलेले ई-व्होटिंग मॅन्युअल व फ्रीक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (''एफएक्यू'ज'') पाहू शकाल किंवा helpdesk.evoting@cdslindia.com यावर ईमेल पाठवू शकाल किंवा श्री. नितीन कुंदर (०२२-२३०५८७३८) किंवा श्री. मेहबूब लखानी (०२२-२३०५८५४३) किंवा श्री.